# धर्मराज्य पक्षाचा जाहीरनामा...

धर्मराज्य पक्षाचे २५-ठाणे लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार

# ‘नितीन देशपांडे’

निवडून आल्यास काय करणार... ???

## प्रथम, ठाणे–जिल्ह्यासाठी....

### जिल्हा–विभाजन...

ठाणे-जिल्हा हा भारतातील सर्वांत मोठा (सात महानगरपालिका व पाच नगरपालिका असलेला व ७०% औद्योगिकरण झालेला हा सागरी, नागरी व डोंगरी जिल्हा) व आदिवासीबहुल जिल्हा आहे. ठाणे-जिल्ह्याच्या दुर्गम भागात राहाणाऱ्या आदिवासी जनतेच्या सोयीसाठी आणि विभागीय सर्वांगीण विकासासाठी, ठाणे जिल्ह्याचे विभाजन वा तशी गरज भासल्यास त्रिभाजन व्हावे म्हणून, सर्व शक्ति एकवटून प्रयत्न.

### भ्रष्टाचार निर्मूलन....

संपूर्ण ठाणे-जिल्हा हा भारतात, महाप्रचंड भ्रष्टाचार व मोठ्याप्रमाणावरील बेकायदा वा अनधिकृत बांधकामांसाठी अत्यंत कुप्रसिद्ध आहे. ठाणे-जिल्ह्यातील ही भ्रष्टाचाराची माजलेली बजबजपुरी संपविण्यासाठी... ‘नंदलाल-समिती’ अहवालासह (ज्या अहवालात सध्याची लोकसभा निवडणूक लढवणाऱ्या एका लोकप्रतिनिधीची ‘आरोपी’ म्हणून सुस्पष्ट व लाजिरवाणी नोंद आहे!) ठाणे, नवी मुंबई, मीरा-भाईंदर महापालिकेत सिद्ध झालेले लहानमोठे भ्रष्टाचाराचे घोटाळे धसास लावण्यासाठी मुळापासून पुन्हा प्रयत्न. तसेच, ठाणे, नवी मुंबई व मीरा-भाईंदर महापालिकांच्या आवक व जावक, या दोन्हींवर आणि केंद्र वा राज्य सरकारकडून त्यांना मिळणाऱ्या अनुदानांच्या विनियोगावर करडी नजर.

### अनधिकृत झोपडपट्ट्या व फेरीवाले...

वर्ष-१९९५ नंतरच्या एकूण एक अनधिकृत परप्रांतीय झोपडपट्ट्या, कुठलाही मुलाहिजा ‘न’ ठेवता, हटविण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न... ‘खासदार’ म्हणून ठाण्यात यापुढे एकही ‘बेकायदा झोपडी वा फेरीवाला’ उभा राहू ‘न’ देण्यासाठी; तसेच, सर्वपक्षीय अनधिकृत पक्ष कार्यालयं पाडून टाकण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयानं दिलेल्या आदेशानुसार विशेष प्रयत्न.... जेणेकरुन ‘अधिकृत जगण्याचा’ व सर्वांनीच कायद्याची बूज राखण्याचा प्रखर संदेश सर्वत्र जाईल.

### क्लस्टर–डेव्हलपमेंट....

प्रस्तावित ‘क्लस्टर-डेव्हलपमेंट’ योजनेची अपरिहार्यता हे, ठाणे-जिल्ह्यातील गेल्या ३०-४० वर्षांतील अत्यंत भ्रष्ट, बेजबाबदार व गुंडशाहीच्या राजकारणाचा एकूण परिपाक आहे. सामान्य जनतेला हे समजावून सांगितलं गेलं पाहीजे की, “आज ‘क्लस्टर’चे टॉवर.... उद्या, २५-३० वर्षांनंतर तुम्हाला फुकट-घरं देण्यासाठी काय हे ‘बिल्डर-राजकारणी’ बांधणार आहेत, ‘आयफेल टॉवर’ ???”....तेव्हा, ‘क्लस्टर-डेव्हलपमेंट’ची योजना ही केवळ, “आजचं मरणं उद्यावर ढकलणं आहे”... हे, लोकांनी नीट समजूनउमजून घेणं गरजेचं आहे. तरीसुद्धा, ‘आखरी रास्ता’ म्हणून ही योजना स्विकारण्यास प्राप्त परिस्थितीत पर्यायचं शिल्लक नसेलं; तर, ती खाजगी बिल्डरांकडून (विशेषत: बिल्डर-राजकारण्यांकडून) राबविली ‘न’ जाता, अत्यंत पारदर्शकपणे सरकारतर्फे राबविली जाण्यासाठी आणि त्यात महाराष्ट्रातल्या ‘मायमराठ्यांना’ झुकतं माप दिलं जाण्यासाठी सर्वंकष प्रयत्न.

### रासायनिक–कारखान्यांमुळे होणारे घातक रासायनिक प्रदूषण.....

ठाणे जिल्ह्यातील (विशेषत: डोंबिवली MIDC मधील), महाराष्ट्र-राज्यातील व देशातील ‘प्रदूषणकारी’ कारखाने बंद करण्यासाठी संसदीय व केंद्रिय पातळीवर पाठपुरावा....

### महापालिकांच्या मराठी शाळांची दुरावस्था...

खासदार-निधी व खासदारकीच्या अधिकार-जबाबदारीतून मराठी शाळांना ऊर्जितावस्था प्राप्त करुन देणे व त्याद्वारे मायमराठी-संस्कृति आणि मराठी विद्यार्थीवर्गाचं उन्नयन साधण्याचा संकल्प.

### ‘कार्बनमुक्त व विनाप्रदूषण’ सायकलस्वारी...

मुख्य रस्त्याला विभागणारी हिरवीगार झाडीची भिंत उभी करुन (रस्त्यावरील धूळ व वाहनांच्या धूराचा त्रास कमी व्हावा म्हणून), सायकलस्वारांसाठी स्वतंत्र अशा ‘सायकल-मार्गिका’ ठाणे, नवी मुंबई व मीरा-भाईंदरमध्ये निर्मिण्याचा संकल्प; तसेच, ‘सायकल-निर्मिती पूर्णत: करमुक्त’ व्हावी व सायकल-स्वारांना आरामदायी अशा, ‘गियर्स’ असलेल्या सायकली अतिशय स्वस्तात उपलब्ध व्हाव्यात म्हणून, खास सरकारी-अनुदानासाठी आग्रह.... (जेणेकरुन, पर्यावरणीय व वैयक्तिक आरोग्याच्या दृष्टीकोनातून जणू ‘पंढरीची वारी’ असणाऱ्या, ‘सायकलस्वारी’ला व सायकल-वाहतूकीला चालना मिळेलं!).

विशेष नमूद करायची बाब म्हणजे, ‘धर्मराज्य पक्षा’चे होऊ घातलेले ‘खासदार’ हे, स्वत: फार पूर्वीपासूनच ‘सायकलस्वार’ म्हणून ठाणेकरांना चिरपरिचित असून, आजही ते बहुतांश वेळा सायकलवरुनच ठाण्यात फिरतात.

### खाजगी गाड्यांमुळे होणारे भरमसाठ कार्बन–ऊत्सर्जन व प्रदूषण...

‘खाजगी-कार/एसयूव्ही वाहतूकी’द्वारे मोठ्याप्रमाणावर होणाऱ्या ‘कार्बन-ऊत्सर्जना’ची मात्रा कमी करण्यासाठी, तातडीचा व महत्त्वपूर्ण पर्याय म्हणून, ‘सार्वजनिक-वाहतूक सेवे’ला स्वस्त व कार्यक्षम करण्यासाठी प्राधान्य. ठाणे-लोकसभा मतदारसंघातील टीएमटी, एनएमएमटी, एमबीएमटी बस-सेवा ‘नि:शुल्क’ देण्यासाठी मूलभूत स्वरुपाचे प्रयत्न.

### ठाण्याचं नंदनवन व फुप्फुस असलेलं येऊर...

येऊरमधील बड्या धेंडांचे शिल्लक असलेले अनधिकृत बंगले व इतर अनधिकृत बांधकामे हटवून, येऊरचं निसर्गवैभव व वन्य जीवांचा अधिवास निर्वेध राखण्याचा जोरदार आग्रह.....

### वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे.....

ठाण्यातील उरल्यासुरल्या वृक्षराजीला, ‘राजकारणी-बिल्डर’लॉबी पुरस्कृत, बेकायदा वृक्षतोडीच्या ‘सैतानी-छाये’पासून संपूर्ण संरक्षण. तसेच, जे काही थोडेबहुत तलाव, विहीरी, बागबगीचे, मैदाने, तिवराची किंवा खारफुटीची जंगलं शिल्लक आहेत, त्यांचं जीवाच्या करारानं संरक्षण.

### उध्वस्त झालेला ‘ठाण्यातील भूमिपुत्र’ आगरी व कोळी समाज.....

रासायनिक कारखान्यांचे प्रदुषित सांडपाणी खाडीमध्ये मोठ्याप्रमाणावर सोडले जात राहील्याने; तसेच, सागरी-जीवनाचा पाया असलेली खारफुटीची वा तिवरांची ठाणे-खाडीकिनारीची जंगलं ठाण्यातील सर्वपक्षीय बिल्डर-राजकारण्यांनी स्वार्थासाठी संगनमतानं उध्वस्त केल्यामुळे, ठाण्यातील भूमिपुत्र आगरी/कोळी समाजाचे मासेमारी, भातशेती व मिठागरांसारखे पारंपारिक व्यवसाय कायमस्वरुपी संपुष्टात आले.

आज दिशाहिन अवस्थेत भरकटणाऱ्या, या समाजातील तरुणवर्गाला मानसिक आधार देत, भविष्याचा चांगला मार्ग दाखविणाऱ्या योजना उदा. ‘कंत्राटी-कामगार पद्धत’ निर्मूलनाद्वारे कायमस्वरुपी चांगल्या पगाराच्या नोकऱ्या, लष्कर भरती, भूमिपुत्रांना उद्योगधंद्यात प्राधान्य व त्यांच्यात उद्यमशीलता रुजविणे इ. ‘धर्मराज्य पक्षा’चा भावी खासदार आखेल.

### रेल्वेप्रवाशांच्या सोयीसुविधा....

अ) रेल्वे-प्रवासासंदर्भात नवनवे मोठे संकल्प सोडण्याअगोदर... वारंवार होणारे मेगा-ब्लॉक, तांत्रिक-बिघाड, विविध नौटंकी राजकीय आंदोलनांमुळे होणारा नेहमीचा उपद्रव, रेल्वे-अपघातांचे मोठे प्रमाण, रेल्वे-स्थानकांवरील गैरसोयी, लांबच्या रेल्वे-प्रवासाच्या आरक्षणाच्या बाबतीतील रेल्वेने नेमलेल्या दलालांचा व त्यांच्या गुंडांचा उपद्रव आणि त्यासंदर्भात भ्रष्ट रेल्वे-पोलिसांची हेतुपुरस्सर निष्क्रियता आणि रेल्वे-मंत्रालयाने सातत्याने ‘मागणी-पुरवठ्या’च्या समीकरणाकडे आजवर केलेले अक्षम्य दुर्लक्ष... या सर्वच बाबतीत अत्यंत सजगपणे जोरदार पाठपुरावा करुन रेल्वेप्रवाशांना प्रथमच खराखुरा दिलासा देण्यासाठी, ‘धर्मराज्य पक्षा’चा ‘ठाणेदार’ व ‘बाजी प्रभू देशपांडें’सारखा ‘बाणेदार’ ‘खासदार’ श्री. नितीन देशपांडे जंग जंग पछाडेल.

ब) नवी मुंबई-हार्बर रेल्वेमार्गावर वर्ष-१९९२ पासून वाशी पुलासाठी आकारण्यात येणारा, मासिक पासावरील रू.५० आणि तिकिटावरील रू.५ अधिभार तत्काळ रद्द करून उपनगरीय रेल्वे दरात समानता आणण्यासाठीही रेल्वे प्रशासनाकडे जोरदार पाठपुरावा करणार.



### किफायतशीर व तुलनेनं कमी प्रदूषणकारी जलवाहतूक...

ठाणे-लोकसभा मतदारसंघाला सुदैवानं बारमाही पाण्यानं भरलेला निसर्गत: उदंड ‘खाडी-किनारा’ लाभलेला असल्यानं प्रवाशांसाठी व मालाची वाहतूक करण्यासाठी ‘जलवाहतूक’ हा, अत्यंत स्वस्त, कार्यक्षम व तुलनेनं कमीतकमी ‘कार्बन-पाऊलखुणा’ असलेला पर्याय विकसित करण्यावर भर.

### मीरा–भाईंदर, ठाणे येथील अनधिकृत मोबाईल–टॉवर्स....

जागतिक आरोग्य संघटनेनं मोबाईल-टॉवर्सच्या विद्युतचुंबकीय किरणोत्सर्गामुळे आरोग्यावर धोकादायक परिणाम होत असल्याचे वारंवार बजावूनही ठाणे-जिल्ह्यामध्ये, विशेषत: मीरा-भाईंदर परिसरात, नागरिकांच्या आयुष्याशी खेळणारे, मोठ्याप्रमाणावर उभे असलेले अनधिकृत मोबाईल-टॉवर्स हटवायला प्रशासनाला तत्काळ भाग पाडणार.

### गृहसंकुलांच्या नांवावर जमिनीचे बिल्डरांकडून हस्तांतरण (कन्व्हेअन्स् डीड)....

‘धर्मराज्य पक्षा’चे खासदार स्थानिक स्वराज्यसंस्थांकडे व सरकारकडे जोरदार पाठपुरावा करुन,

अ) सोसायट्यांच्या किंवा गृहसंकुलांच्या नांवावर त्यांच्या जमिनींचं तत्काळ हस्तांतरण (डीड ऑफ् कन्व्हेअन्स्) व्हावं म्हणून बिल्डरांवर कायदेशीर दबाव आणेल.

ब) तसेच, ज्या जुन्या सोसायट्यांकडे ‘ऑक्युपेशन-सर्टिफिकेट’ नाही; त्यांच्या नांवावर जमिनींच हस्तांतरण पूर्ण होण्यासाठी जो दंड आकारला जातो तो, सोसायट्यांकडून ‘न’ घेतला जाता, मूळ बिल्डरांकडूनच घेतला जाण्यासाठी सर्वंकष प्रयत्न.

## त्यानंतर, महाराष्ट्र–राज्य, राष्ट्र व विश्वकल्याणासाठी....

- सर्वसामान्य मराठी माणूस.... आज, वाढत्या शहरांनी नाकारलेला व खुराड्यासारख्या घरांतून राहाणारा ‘कंत्राटी-कामगार’ पद्धतीत नोकरीतील ‘सुरक्षितता’ व ‘सन्मानजनक वेतन’ पूर्णत: गमावलेला ‘गुलाम’ व ‘नव-अस्पृश्य’..... स्वत:च्याच राज्यातील ‘दुय्यम-प्रती’चा नागरिक आहे.....

महाराष्ट्रात निर्माण झालेली ‘संपत्ती’च, महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य मराठी माणसांच्या मुळावर आलेली आहे! ‘न्याय आणि भाकरी’.... या दोन्हींपासून तो वंचित झालायं. धनसंपदा-जमीनजायदाद-मोठमोठी घरं-दुकान (सामान्य मराठी माणूस ‘काडेपेटी’च्या आकारातील अनधिकृत घरात. ....जेमतेम राहता येईल पण, हलायला-डुलायला मात्र फारसा वाव नाही, अशा अवस्थेत!

- .....जैन, गुजराती, सिंधी, मारवाड्यांच्या हातात (कालपर्यंत, ‘मुंबई तुमची.... भांडी घासा आमची’ म्हणणारी ‘मातलेली शेठजी-संस्कृति’... आता, “महाराष्ट्र तुमचा.... पण, त्याचा ‘सातबारा’ आमचा”, असं म्हणू धजावू लागलीयं!), तर बहुतांश नोकऱ्या (प्रामुख्यानं तेथील लोकसंख्येच्या विस्फोटामुळे!) उत्तर भारतीय ‘स्वस्त-मजुरां’च्या हातात!!!

...हे, महाराष्ट्रातील मूळनिवासी ‘मायमराठ्यां’वर, इथल्या सर्वपक्षीय ‘दलाल’ मराठी-नेत्यांना (मराठी माणसांच्या नांवाने ‘गळे’ काढणारे... पण, प्रत्यक्षात मराठी-माणसाचे ‘गळे’ कापणारे ‘गवतातले साप’!) हाताशी धरुन केलं गेलेलं व सातत्यानं गेली ४०-४५ वर्षे अत्यंत पद्धतशीरपणे सुरु असलेलं अत्यंत घृणास्पद असं ‘आर्थिक व राजकीय’ आक्रमण आहे... दुसरंतिसरं काही नाही! ही, ‘मराठी-माणसा’च्या जगण्याची झालेली निर्दय ‘कोंडी’ आहे!!

### आणि म्हणूनच...

अ) महाराष्ट्रात व देशात, गुलामगिरी व नव-अस्पृश्यता निर्माण करणारी ‘कंत्राटी-कामगार’ पद्धत तत्काळ नष्ट करुन सन्मानजनक किमान-वेतन’ (सध्याच्या स्थितीत रु. २५,०००/— दरमहा) निश्चितीसाठी केंद्रिय, संसदीय व राज्य पातळीवर कठोर प्रयत्न. तसेच, कंपन्यांमधील सर्वोच्च व्यवस्थापकीय वर्गाच्या ‘वेतन अधिक वेतनेतर सुविधां’चा कामगार-कर्मचाऱ्यांच्या ‘वेतन व वेतनेतर सुविधां’शी राष्ट्रीयस्तरावर तार्किक पद्धतीने ताळमेळ घालून कंपन्यांमधील कामगार-कर्मचाऱ्यांचं शोषण कायमस्वरुपी थांबविण्याचा ‘धर्मराज्य पक्षा’च्या खासदाराचा संसदेत जोरदार आग्रह व प्रयत्नांची शिकस्त..... (जेणेकरुन, भ्रष्ट व बेशिस्त ‘कामगार-संघटना’ व शोषणकेंद्री ‘व्यवस्थापकिय वर्ग, विशेषत: HR-मॅनेजर्स, या साऱ्यांचा अनिष्ट प्रभाव कमी होईल).

ब) तसेच, वरीलप्रमाणे निर्धारित ‘वेतन-संरचना’ आपल्या कामगार-कर्मचाऱ्यांना लागू ‘न’ करणाऱ्या; तसेच, अपरिहार्य परिस्थिती खेरीज ‘मराठी कामगार-कर्मचाऱ्यां’ना सेवेत प्राधान्य ‘न’ देणाऱ्या (अकुशल व अर्धकुशल श्रेणीत मराठी कामगारांना ९०% प्राधान्य) व्यवस्थापकिय मंडळींना तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद करण्यासाठी युद्ध पातळीवरुन प्रयत्न.

### २, भ्रष्टाचाराचं परिपूर्ण निर्मूलन...

अ) अर्थक्रांती-संकल्पना....

भारतीय करसंरचनेतील ‘करगळती’ व भ्रष्टाचार थांबवू शकणारी (भ्रष्टाचाराच्या रोगाविरुद्ध एकप्रकारची ‘लसीकरणा’सारखी मूलगामी उपाययोजना असणारी) श्री. अनिल बोकिल प्रणित ‘अर्थक्रांती-संकल्पना’, ‘कायदा’ करुन राबवण्यासाठी निरंतर प्रयत्न.... त्याद्वारे, ‘आयात-कर’ वगळता देशातील सर्व प्रकारचे कर (आयकर, टोल-टॅक्स, उत्पादन शुल्क, एलबीटी, उपकर इ.) रद्द करुन, केवळ एकच एक ‘बँक व्यवहार कर’ (Bank Transaction Tax) लागू करणे; तसेच, रु. ५० पेक्षा मोठ्या असलेल्या रु. १००, रु. ५०० व रु. १००० च्या नोटा व्यवहारातून रद्द करण्यासारख्या..... करसंरचनेतल्या आमूलाग्र बदलांच्या तरतूदी लागू करण्यासाठी देशाच्या संसदेत प्रथमच प्रयत्न केला जाईल!

ब) जन-लोकपाल कायदा....

या कायद्यातील कठोर तरतूदींचा, अलिकडेच संसदेत पारित झालेल्या ‘लोकपाल’ कायद्यात समावेश करण्यासाठी संसदेत मोहीम.... (जेणेकरुन, देशात आजवर घडून गेलेल्या सगळ्या घोटाळ्यांची सखोल व परिणामकारक चौकशी करुन भ्रष्टाचारातील आरोपी गजाआड करण्याबरोबरच, देशाचं झालेलं आर्थिक नुकसान भरुन काढता येईल).

क) परदेशातील काळा-पैसा....

संयुक्त-राष्ट्रसंघानं जारी केलेल्या निर्देशांनुसार अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स व इटली ही राष्ट्रे ‘स्वीस-बँके’त जमा असलेला काळा पैसा परत आणू शकले; पण, २५ लाख कोटींपेक्षाही जास्त काळा पैसा स्वीस बँकेत असणाऱ्या भारताचे अर्थमंत्री आजवर केवळ, कागदी घोडे नाचवत बसलेत. त्यामुळे, ‘धर्मराज्य पक्षा’चा खासदार संसदेत परदेशातील काळा पैसा भारतात परत आणण्यासाठी सातत्यानं आवाज उठवेल.

ड) भ्रष्टाचाऱ्यांच्या स्थावर-मालमत्ता जप्त व त्यांचं रुपांतर शिक्षण-संस्थांमध्ये....

‘बिहार स्पेशल कोर्ट बिल-२००८’ ...पान क्र ५ वर

**फसव्या धार्मिकरंगाच्या ‘जनताद्रोही दांभिक’ राजकारणाला संपविण्यासाठी... धर्मराज्य पक्ष !!!**

पान क्र ४ वरुन...
कायद्याच्या धर्तीवर, भ्रष्ट सरकारी नोकर आणि राजकारणी यांनी भ्रष्टाचाराच्या पैशातून उभी केलेली स्थावर मालमत्ता ताब्यात घेऊन, त्याजागी उत्कृष्ट दर्जाच्या सरकारी शाळा/महाविद्यालये निर्माण करण्यासाठी 'विशेष कायदा', महाराष्ट्राच्या विधानसभेत संमत होण्यासाठी महाराष्ट्रभर, 'खासदार' या नात्याने, जनजागृती-मोहीम राबवणार.... (त्यामुळे ठाणे, नवी मुंबई, मीरा-भाईंदरमधील राजकारण्यांनी काळ्या-पैशातून उभारलेल्या 'व्हाईट-हाऊस', 'ग्लास-हाऊस' किंवा इतर प्रासादतुल्य वास्तूंमधून तुम्हाला चमत्कार होऊन, दर्जेदार सरकारी शाळा/महाविद्यालये भरलेली दिसू शकतील!)

## *अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांपैकी 'निवारा' या घटका विषयी विशेष भूमिका....*

बिल्डर-राजकारण्यांमुळे, निवारा.... म्हणजेच राहतं घर हे, अलिकडच्या काळात शहरी व निमशहरी भागात 'गुंतवणुकी'चं महत्त्वपूर्ण माध्यम बनलं. त्यामुळे, एकप्रकारे घरांची 'साठेबाजी' होऊन 'काळाबाजार' सुरु झालायं (म्हणूनच राजकारणी, ....एकवेळ चोर, दरोडेखोर असला तरी चालेलं; पण, 'बिल्डर' नको!). ''माणसांना राहायला घरं नाहीत आणि घरांना माणसं नाहीत'' ....असा अजब व उफराटा प्रकार सर्वत्र दिसतोयं (एका प्रथितयश बॉलिवूड अभिनेत्रीचे निव्वळ मुंबईतच २७ फ्लॅट्स् आहेत. तर, बिल्डर व सेटिंगबाज राजकारण्यांचे, भ्रष्ट नोकरशहांचे, जैन-गुजराथी-मारवाडी-सिंधी शेठजींचे स्वत:च्या वा कुटुंबियांच्या नावावर तसेच, 'बेनामी' किती फ्लॅट्स् असतील.... याची कल्पनाच केलेली बरी!) 'आदर्श' सोसायटीतील माजी मुख्यमंत्र्यांच्या नातेवाईकांचे फ्लॅट्स् व त्याच सोसायटीतील ठाण्यातील 'आमदारा'चा फ्लॅट. ... ही ढळढळीत उदाहरणं आहेत. शिवाय, ठाण्यातील आमदारांचे 'राजयोग सोसायटी' भ्रष्टाचार-प्रकरण ठाणेकर विसरले नसतील, अशी आशा आहे.

यासाठी, ग्रामीण भाग वगळता..... तालुके, शहरं, उपनगरं व महानगरं यामध्ये 'घर म्हणजे निवारा, तिथे गुंतवणुकीला नाही थारा'.... या तत्त्वाला अनुसरुन, ''एका कुटुंबाला फक्त एकच घर'' असा 'कायदा' महाराष्ट्रात व्हावा यासाठी, 'खासदार' या नात्याने जोरदार मोहीम उघडणार. .... जेणेकरुन, ठाणे-पुणे-मुंबई सारख्या शहरांमधून सध्या रिकामे असलेले लाखो फ्लॅट्स् एकाच वेळी बाजारात विक्रीस निघून, राहत्या ''घरांच्या किंमती निम्म्याहूनही कमी'' होऊन त्या सर्वसामान्यांच्या आवाक्यात येण्यास राज्यात प्रथमच सुरुवात होईल.

त्यातूनच किंवा स्वतंत्रपणे, सर्व पोलीस व इतर शासकिय कर्मचाऱ्यांसाठी राहत्या घरांची सोय करणं, याला अग्रक्रम देण्याचा प्रयत्न.

## *पर्यावरण–संरक्षण...*

संसाराचा गाडा हाकताना जसा, प्रत्येक खर्च आपलं 'बजेट' पाहूनच करायचा असतो....तसचं, पर्यावरणीय संकटांच्या खाईत सापडलेल्या या जगानं, 'विकासाच्या प्रारुपा'च्या (development-model) व जीवनशैलीतल्या प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत आपल्या 'भूमाते'चं उरलंसुरलं 'कार्बन बजेट' विचारात घेऊनच पुढचं पाऊल टाकलं पाहीजे. यापुढे, युद्धपातळीवर 'कार्बन-ऊत्सर्जना'ला जगभर तातडीनं आळा घातला गेला नाही तर, मानवजातीसह अवघ्या चराचरसृष्टीचा विनाश येत्या काही दशकांतच अटळ होईल. आपल्या पुढील पिढ्यांच्या संकटग्रस्त अस्तित्वाचा विचार करता, आपल्या हाती वेळ फारच थोडा शिल्लक राहीलेला आहे.

श्रीमंत बापाच्या पैशाच्या जीवावर उधळमाधळ करणाऱ्या बेजबाबदार 'विलासी-चैनी मुलाच्या' भूमिकेत सध्याची आधुनिक-मानवजमात आहे. पृथ्वीमातेच्या नैसर्गिक साधनसंपत्तीची बेलगाम उधळण ही, आधुनिक मानवजमात करतेचं आहे...सोबत, किमान १२०० वर्ष टिकणारा 'कार्बन'च्या कर्जाचा बोजा ती पृथ्वीवर लादतेयं. या भारानं आजच कमालीची संत्रस्त झालेली पृथ्वीमाता.... हा भार असह्य झाला की, आपल्या मस्तकावर धारण केलेल्या 'चराचर सृष्टी'च्या अस्तित्वाचे पंख मिटवून घेईलं. आज, आपली पृथ्वीमाता रोगग्रस्त झालीयं....तिला ज्वर भरलायं. ..ती तापानं फणफणलीयं (पृथ्वीचं सरासरी तापमान १.५$^0$C इतकं धोकादायकरित्या वाढलयं!)

''माणसांची आधुनिक चंगळवादी जीवनशैली आणि माणसांची बेफाम वाढती संख्या'' ....हीच प्रमुख कारणं, यामागे दडलेली आहेत. जैवबहुविधतेनं नटलेल्या आपल्या पृथ्वीवर प्रत्येक सजीव जातीजमातींच्या (ज्याचा उल्लेख भारतीय तत्त्वज्ञानात 'चौऱ्यांशी लक्ष योनी' म्हणून करण्यात आलेला आहे) कमाल-संख्येचा समतोल; ही सर्व सजीवसृष्टी ज्यावर आधारलेली आहे, त्या सूर्याच्या ऊर्जेवर निर्धारित ''सोलर-कॉन्स्टंट'' (Solar-constant) या संकल्पने बरहुकूम निसर्ग राखत असतो.... त्यात, विज्ञानाच्या आधारे अक्षम्य ढवळाढवळ करुन, निसर्गत: राखली जाणारी मानवी लोकसंख्येची 'लक्ष्मणरेषा' मानवजातीनं केव्हाच ओलांडलीयं. आणि, दुसऱ्या बाजुला अनेक जीवजाती मानवी हस्तक्षेप व पर्यावरणाला घातक अशा आधुनिक जीवनशैलीमुळे झपाट्यानं फार मोठ्या प्रमाणावर अस्तंगत होत चालल्यातं...अशातऱ्हेनं पर्यावरणीय संकट हे 'दुहेरी' स्वरुपाचं आहे!

जगभरातील पर्यावरणतज्ज्ञ संपूर्ण जगाची लोकसंख्या २५०-३०० कोटी पर्यंतच सीमित ठेवण्याबाबत ठाम प्रतिपादन करत असताना; फक्त भारताच्याच लोकसंख्येनं १२५ कोटीचं टोक गाठणं म्हणजे, नजिकच्या भविष्यात, भीषण स्वरुपाच्या पर्यावरणीय संकटांना आमंत्रण देणं, नव्हे काय?

......निसर्गाविरुद्ध चाललेल्या मानवी व्यवहारांची परिणिती म्हणून वाढत चाललेल्या 'कार्बन-ऊत्सर्जना'मुळे 'जागतिक-तापमानवृद्धी' (किंवा, अनाकलनीय व अनियमित पर्यावरणीय बदल), पेयजलाचं दुर्भिक्ष्य, रासायनिक तसेच आण्विक प्रदूषण, वृक्षतोड, जैव-बहुविधतेची अपरिमित हानी, समुद्रीजलाचं वाढतं आम्लीकरण, क्षतिग्रस्त ओझोन वायूमंडळ, नैसर्गिक फॉस्फरस-नायट्रोजन-कार्बन चक्रात मोठ्याप्रमाणावर उलथापालथ, भूपृष्ठीय-संरचनेत हानिकारक बदल (Land Cover Changes).... या सगळ्यांचा एकत्रित परिणाम म्हणून, आजच जी पर्यावरणीय संकटं, 'महाप्रलयाच्या महानाट्याची नांदी' म्हणून सर्वत्र थैमान घालू लागलीयतं आणि पृथ्वीमातेच्या अवघ्या चराचरसृष्टीच्या अस्तित्वावरच जे प्रश्नचिन्ह निर्माण झालेलं आहे, ते पाहता आपल्याला 'देशाचं संरक्षणक्षेत्र, संरक्षणदले, राष्ट्रीय-संशोधनसंस्था व आरोग्य क्षेत्र वगळता', आता भर 'पर्यायी-विकासनीति'वर नव्हे तर, आजकालच्या तथाकथित 'विकासनीतिला पर्याय' देणाऱ्या साध्यासुध्या (साधी राहणी उच्च विचारसरणी!) 'पर्यावरणस्नेही-जीवनशैली'वरच (Sustainable, Simple and Organic Life-Style) दिला पाहीजे..... रसायन तसेच, कार्बन मुक्त नैसर्गिक किंवा सेंद्रिय शेतकी-पद्धत (Natural-Farming) म्हणजेच पुरातन ऋषि-कृषि परंपरा आणि कमीतकमी कार्बन-ऊत्सर्जन करणारे आणि घातक रसायनांचा वापर वा उत्पादन 'न' करणाऱ्या उद्योगांनाच प्रोत्साहन देणे; या जीवनशैलीत अभिप्रेत असेल.... भविष्यातील पिढ्यानपिढ्यांना आणि संपूर्ण सजीवसृष्टीला अंति नष्टप्राय करु शकणाऱ्या आधुनिक 'विकास-प्रारुपा'ला उत्तेजन देऊन व बेलगाम वाढत्या लोकसंख्येला कठोरपणे आळा 'न' घालता, आम्ही विनाशाच्या दिशेनं अजून कितीकाळ अशीच वाटचाल करीत राहणार आहोत?

....आणि म्हणूनच, नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'इंटरगव्हर्नमेंटल पॅनेल ऑन् क्लायमॅटिक चेंज' (I.P.C.C.) च्या अहवालाचं गांभीर्य ध्यानात घेऊन, 'धर्मराज्य पक्षा'चा खासदार खालीलप्रमाणे भूमिका घेईल.....

अ) पिढ्यापिढ्यांच्या हितासाठी जैवबहुविधतेचं संरक्षण व संवर्धन करण्यासाठी व्यापक भूमिका (उदा. कोकणासह संपूर्ण पश्चिमघाट परिसरात, डॉ. माधव गाडगीळ समितीच्या व तत्सम देशातील उर्वरित भागासाठीच्या पर्यावरणीय शिफारशींची तंतोतंत अंमलबजावणी)

ब) अवघं कोकण उध्वस्त करु पाहणाऱ्या, 'जैतापूर-अणुऊर्जा प्रकल्पा'सह, देशातील सर्वच विनाशकारी अणुऊर्जा-प्रकल्पांना व येऊ घातलेल्या (लाखो टनांची कोळशाची राख पसरवणाऱ्या) 'औष्णिक-ऊर्जा प्रकल्पां'ना संसदीय व केंद्रिय पातळीवर ठाम विरोध....

क) देशभरातील मोठ्याप्रमाणावर रासायनिक-प्रदूषण करणाऱ्या व 'कार्बनकेंद्री' कारखान्यांवर कडक उपाययोजनांचा आग्रह....

ड) 'नासा'चे माजी संचालक व 'स्टॉर्म्स् ऑफ् माय ग्रॅंड-चिल्ड्रेन' पुस्तकाचे लेखक श्री. जेम्स् हॅन्सेन् यांनी सुचविल्याप्रमाणे, व्यक्तिगत वाहतुकीसाठी खनिज इंधनाचा अवास्तव वापर कमी व्हावा म्हणून, 'सामान्य माणसांवर कुठलाही आर्थिक बोजा 'न' टाकणारा'..... ''कार्बन-टॅक्स''(Carbon-Tax), हा विशेष स्वरुपाचा 'पर्यावरणीय कर', खनिज इंधनाचं (तेल, नैसर्गिक वायू इ.) उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवर आकारण्याचा आग्रह (ज्यामध्ये, यातून उभ्या राहणाऱ्या राष्ट्रीय स्वरुपाच्या मोठ्या निधीतून सामान्य ग्राहकांच्या बॅंक-खात्यात दरमहा विशिष्ट रोख रकमेचं अनुदान थेट भरलं जाणं, अभिप्रेत आहे!)....

इ) नाहक कार्बन-ऊत्सर्जन करणाऱ्या मोटर कार्सच्या शर्यतींवर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवर तातडीनं 'बंदी' आणण्यासाठी सर्वंकष प्रयत्न व मोहीम...... तसेच, तुलनेनं अतिशय कमी 'कार्बन-पाऊलखुणा' (carbon-footprint) असणाऱ्या देशी खेळांना (कॅरम, कबड्डी, खो-खो, लंगडी, मलखांब, कुस्ती इ.) सरकारीस्तरावर प्रोत्साहन.

इ) 'लोकसंख्या-नियंत्रणा'साठी राष्ट्रीयस्तरावर कठोर (उदा. तिसऱ्या अपत्याला जन्म देणाऱ्या कुठल्याही जोडप्याचा 'मतदाना'चा हक्क काढून घेणे व त्या जोडप्याला सरकारी सोयिसुविधा तहहयात नाकारणे) तसेच, 'प्रोत्साहनपर' उपाययोजनांच्या संदर्भात (उदा. एका मुलीच्या पाठीवर 'कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया' करवून घेणाऱ्या जोडप्याच्या मुलीच्या नांवावर लाखाहून अधिक रकमेची बॅंक-मुदतठेव) संसदेत तसेच, केंद्र व राज्य सरकारांकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा.....

ई) पर्यावरणाला व व्यक्तिगत आरोग्याला अत्यंत हानिकारक अशा पाश्चात्य चंगळवादी जीवनशैलीला (पाश्चात्य ''कोप्पी-संस्कृति'' म्हणजेच, कोकाकोला-पब-पिझ्झा संस्कृति) आटोक्यात आणण्यासाठी, 'टॉप डाऊन' पद्धतीने सरकारी पातळीवरुन धोरणात्मक निर्णय घ्यायला लावण्यासाठी 'खासदारकी'च्या महत्त्वपूर्ण भूमिकेतून भगीरथ प्रयत्न.




## *शिक्षण किंवा विद्यादानातील गरीब–श्रीमंत भेद....*

शिक्षण, ही बाब 'नफा कमावण्याची संधी' नसून, 'राष्ट्र-उभारणी'चं महान कार्य आहे. म्हणून अलिकडे शिक्षणक्षेत्रात निर्माण झालेली 'नव-चातुर्वर्ण्य व्यवस्था' संपविण्यासाठी...खाजगी 'शिक्षणसम्राटां'च्या सरसकट सगळ्या 'शिक्षणसंस्थां'च 'राष्ट्रीयीकरण' करुन ताब्यात घेण्यासाठी व त्या सार्वजनिकरित्या चालविण्यासाठी केंद्र व राज्य पातळीवर 'विशेष कायदा' करण्यासाठी प्रयत्न... (जेणेकरुन, सामान्य आर्थिकस्थितीतल्या होतकरु विद्यार्थ्यांना 'विनाआरक्षण' शिक्षणाची 'समान संधी' मिळू शकेल).

## *नि:शुल्क, तत्पर व उत्तम दर्जाची सार्वजनिक–आरोग्यसेवा....*

महागड्या व लुटारु खाजगी आरोग्यसेवेमुळे, घरातील एखाद्या व्यक्तीस, एखादा जरी गंभीर आजार वा अपघात झाल्यास, ते संपूर्ण घर आर्थिकदृष्ट्या डबघाईला येतं. .... म्हणून, पारकदर्शक, स्वच्छ, तत्पर व कार्यक्षम सार्वजनिक-आरोग्यसेवा नि:शुल्क देण्यासाठी मूलगामी स्वरुपाचे प्रयत्न.....

## *नागरिकांची (विशेषत: महिला व ज्येष्ठ नागरिकांची) सुरक्षितता...*

अ) 'दहा अपराधी सुटले तरी चालतील; पण, एकही निरपराधी फासावर जाता कामा नये'..... यासारखी न्यायदानातील 'ब्लॅकस्टोन फॉर्म्युलेशन'ची भोंगळ तत्त्वे बाजुला सारुन, 'आरोपीवर स्वत:च निरपराधित्व सिद्ध करण्याची' मोठी जबाबदारी टाकली गेली पाहीजे.

'न्यायदान' सत्वर, भ्रष्टाचारमुक्त व नि:पक्षपातीपणे होण्यासाठी संस्थात्मक बदल केले गेले पाहीजेत... उदा. ज्युडिशियल अकाऊंटॅबिलीटी बिल, तसेच परदेशात १० लाख नागरिकांमागे ५० ते १०० न्यायाधीश हे प्रमाण असताना, आपण निदान सध्याचं १० लाख लोकसंख्येला सरासरी १३ असलेलं न्यायाधीशांच्या संख्येचं प्रमाण वाढवून किमान ते ५० पर्यंत तरी तत्काळ नेलं पाहीजे (त्यासाठी आपल्याकडे आहेत त्या पायाभूत-सुविधा वापरुन 'अर्थक्रांती-संकल्पने'त जसं, बॅंका २४ तास चालू ठेवण्याची सूचना आहे; त्याप्रमाणेच, न्यायालयेसुद्धा ६ तासांची एक पाळी अशारितीने ६ x ४ = २४ तास सुरु ठेवली गेली पाहीजेत व 'तारीख पे तारीख' या वाईट प्रघाताला आळा घातला पाहीजे.

ब) महिला-ज्येष्ठ नागरिक व आम नागरिकांच्या संरक्षणासाठी पोलिसदल, भ्रष्ट व अनिष्ट राजकीय प्रभावापासून मुक्त राखण्यासाठी व्यक्तिगत व संस्थात्मक प्रयत्न..... (जेणेकरुन, काही काळापूर्वी नवी मुंबईत दोन पोलिसांचा दिवसाढवळ्या खून पाडणाऱ्या 'भंगार-माफियां'ना, ठाणे-जिल्ह्यातील 'घराणेबाज' राजकीय वरदहस्तामुळे 'कायद्याचा मुडदा पाडून' सोडण्यात आले होते..... अशा, अमानुष व घृणास्पद घटना घडूच शकणार नाहीत!)

क) प्रशासन व कायदा-सुव्यवस्था पाहताना 'जातिधर्माचा' विचारही मनास स्पर्शू 'न' देता, 'नैसर्गिक-न्याया'च्या तत्वानुसार सर्वांना समान 'न्याय' देणारी व्यवस्था राहावी, यासाठी खास प्रयत्न.... प्रसंगी, 'भाकरी' पेक्षाही 'न्याय' महत्त्वाचा; हा, न्यायदानाबाबतचा 'शिवछत्रपतीं'समान कठोर दृष्टिकोन!

विशेषत: धार्मिक वा जातीय दंगलीसंदर्भात..... धार्मिक-दंगलखोर कुठल्या जातिधर्माचा आहे, याचा काडीमात्र विचार 'न' करता वा त्याबाबतीत य:किंचितही भेदभाव 'न' करता, कायमची जरब बसेल, अशी त्यांच्यावर अत्यंत कठोर कारवाई केली जाईल.

.....अशातऱ्हेनं, प्रजाजनांच्या संरक्षणासाठी, 'खऱ्याखुऱ्या' जातिवंत 'शिवशाही'सम खडा 'पहारा' व भेदक 'दरारा' असणारी, तत्पर व नि:पक्षपाती कायदा-सुव्यवस्था निर्मितीसाठी यत्न.

## *परिपूर्ण संघराज्यीय–संरचना आणि अध्यक्षीय–लोकशाही पद्धत....*

'भारत' एक परिपूर्णतया 'संघराज्यीय-संरचना' (Complete Federal-Stucture.... राष्ट्रांतर्गत राष्ट्र, 'स्वायत्त' महाराष्ट्र!) असलेलं 'राष्ट्र' म्हणून, यापुढे अधिक वेळ 'न' गमावता उभं केलं पाहीजे; तसेच, देशात 'अध्यक्षीय-पद्धती'ची लोकशाही संरचना (यासंदर्भात देशात खरखुरं राष्ट्रीय-बाण्याचं नेतृत्त्व 'राष्ट्राध्यक्ष' म्हणून उभं राहावं, यासाठी 'धर्मराज्य पक्षा'च्या काही खास सूचना आहेत!) निर्माण केली गेली पाहीजे.... आणि, प्रत्येक राज्यात 'संघराज्यीय-स्वायत्तते' सोबत त्या राज्याची स्थानिक-भाषा (उदा. महाराष्ट्राची मराठी, गुजरातची गुजराती, तामीळनाडूची तामीळ इ.) अनिवार्यपणे राज्याचे संपूर्ण व्यवहार, शिक्षण, कायदा-सुव्यवस्था यासाठीची 'भाषा' बनली पाहीजे.... निव्वळ बोली भाषा म्हणून नव्हे!

......यासाठी, 'धर्मराज्य पक्षा'चा खासदार निरंतर प्रयत्नशील राहील; तसेच, अशातऱ्हेच्या प्रयत्नांना हिरिरीने पाठींबा देईल.

## *निवडणूक सुधारणा...*

भारतीय निवडणूक-पद्धतीचं 'वेस्ट मिन्स्टर मॉडेल' ('फर्स्ट पास्ट द पोस्ट' तत्त्वावर आधारलेलं) आमूलाग्र बदलून प्रथमत: किमान 'राईट टू रिजेक्ट' (त्यानंतर योग्य समयी 'राईट टू रिकॉल') निवडणूक-पद्धतीचं अविभाज्य अंग बनलं पाहीजे... यासाठीही, 'धर्मराज्य पक्षा'चा खासदार प्रयत्नरत राहील.

## *किरकोळ विक्री व्यवसायातील FDI....*

किरकोळ-विक्री व्यवसायात; तसेच, अनावश्यक क्षेत्रात थेट परकीय गुंतवणुकीला (FDI) ठाम विरोध.

## *बळीराजाच्या हितासाठी...*

शेतकऱ्यांना किफायतशीर व रास्तभाव मिळण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या शेतमालाची साठवणूक व वाहतूकीसाठी सरकारतर्फे पायाभूत-सुविधा उभारणीसाठी आग्रह.

## *'राज्य–जल आयोगा'ची स्थापना...*

आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय मानकांनुसार समन्यायी पाण्याचं वाटप निश्चित करण्यासाठी व पाण्याच्या दर-निश्चितीसाठी 'राज्य जल-आयोग' निर्माण करण्याचा आग्रह.

**अनेकांना पडू शकणारा प्रश्न... 'धर्मराज्य पक्षा'चा केवळ एक 'खासदार' संसदेत जाऊन काय करणार...???**

**सर्वप्रथम एक गोष्ट ध्यानात घेतली पाहीजे की, सध्याच्या 'संमिश्र सरकारच्या जमान्यात प्रत्येक खासदार व त्याची सैद्धांतिक भूमिका महत्त्वाची असते.' 'धर्मराज्य पक्षा'चं राजकारण सैद्धांतिक भूमिका व मुद्दयांवरच आधारित असल्यानं... 'धर्मराज्य पक्षा'चा १०० टक्के प्रामाणिक व 'जाणता' खासदार संसदेत गेल्यानंतर संसदीय राजकारणाची 'नौका' योग्य दिशेने प्रथमत:च हाकारली जाऊ शकेलं.**

**....''पातेलभर दुधाचं दही करायला.... चमचाभर दह्याचं विरजण लागतं, पातेलभर दह्याचं नव्हे!''**

**भारतीय संसदेत सुरुवातीला, नेक (प्रामाणिक)..... 'एक'... पुढे 'नेक' ....अनेक... धर्मराज्य पक्षामुळे सशक्त, सक्षम, समाधानी भारतीय... 'प्रत्येक'!!!** ■

**|| सत्यमेव जयते ||**

**जय महाराष्ट्र ...जय हिंद !!!**

''विश्वासघातकी राजकारण्यांमुळे राजकीय व आर्थिक कोंडीत सापडून लाचार झालेल्या, सर्वसामान्य माणसाला सन्मानानं आणि स्वाभिमानानं जगविण्यासाठी.... धर्मराज्य पक्ष!!!